# सराव प्रश्नपत्रिका–3

**विषय : इतिहास व राज्यशास्त्र** | **गुण : ६०**

**इयत्ता : १० वी** | **वेळ : २.३० तास**

**सूचना :**

(१) सर्व कृती/प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(२) उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतीचे पूर्ण गुण दर्शवतात.

(३) प्रश्न क्र. १ ते ५ इतिहास व प्रश्न क्र. ६ ते ९ राज्यशास्त्र या विषयांवरील आहेत.

(४) प्रश्न १ (अ) मध्ये संपूर्ण विधान लिहिणे आवश्यक आहे.

(५) प्रश्न १ (ब) मधील प्रत्येक संचातील पहिला घटक तसाच ठेवून दुसऱ्या घटकाची दुरूस्ती करणे अपेक्षित आहे.

(६) प्रश्न २ (अ)मधील दिलेले संकल्पना चित्र त्यात नमुना आराखड्यानुसार पेनने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.

---

**प्र. १ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा. (गुण ४)**

(१) 'आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज' हा ग्रंथ ............... यांनी लिहिला.

अ) कार्ल मार्क्स    ब) मायकेल फुको

क) लुसिआँ फेबर    ड) व्हॉल्टेअर

(२) 'हितोपदेश' या संस्कृत ग्रंथाचा जर्मन भाषेत अनुवाद ............... यांनी केला.

अ) जेम्स मिल    ब) फ्रेडरिक मॅक्सम्युलर

क) माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन    ड) जॉन मार्शल

(३) जगातील सर्वात प्राचीन संग्रहालय ............... या शहराचे उत्खनन करताना सापडले.

अ) दिल्ली    ब) हडप्पा

क) उर    ड) कोलकाता

(४) मथुरा शिल्पशैली ............... काळात उदयास आली.

अ) कुशाण    ब) गुप्त

क) राष्ट्रकूट    ड) मौर्य

**(ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा. (गुण ४)**

(१) i) महाराज सयाजीराव विद्यापीठ – दिल्ली

ii) बनारस हिंदू विद्यापीठ – वाराणसी

iii) अलिगढ मुस्लीम युनिव्हर्सिटी – अलिगढ

iv) जिवाजी विद्यापीठ – ग्वालियर

दुरुस्त जोडी – ..............................

(२) i) माथेरान – थंड हवेचे ठिकाण
ii) ताडोबा – लेणी
iii) कोल्हापूर – देवस्थान
iv) अजिंठा – जागतिक वारसास्थळ

दुरुस्त जोडी – ..............................

(३) i) रायगडाला जेव्हा जाग येते – वसंत कानेटकर
ii) टिळक आणि आगरकर – विश्राम बेडेकर
iii) साष्टांग नमस्कार – आचार्य अत्रे
iv) एकच प्याला – अण्णासाहेब किर्लोस्कर

दुरुस्त जोडी – ..............................

(४) i) प्रभाकर – आचार्य अत्रे
ii) दर्पण – बाळशास्त्री जांभेकर
iii) दीनबंधु – कृष्णराव भालेकर
iv) केसरी – बाळ गंगाधर टिळक

दुरुस्त जोडी – ..............................

**प्र. २ (अ) दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा. (कोणतेही २)** **(गुण ४)**


(१)

| मंदिर स्थापत्य | द्राविड | हेमाडपंती |
|---|---|---|
| वैशिष्ट्ये | ------------<br>------------ | ------------<br>------------ |
| उदाहरणे | ------------<br>------------ | ------------<br>------------ |

(२)

| | |
|---|---|
| जेम्स मिल | द हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया |
| जेम्स ग्रँड डफ | ............................ |
| ...................... | द हिस्टरी ऑफ इंडिया |
| श्री.अ.डांगे | ............................ |
| ...................... | हू वेअर द शूद्राज |

(३)




**प्र.२ (ब) टीपा लिहा. (कोणत्याही २)** **(गुण ४)**

(१) ॲनल्स प्रणाली

(२) अभिलेखागार

(३) मराठा चित्रशैली

**प्र. ३ (अ) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. (कोणतेही २)** **(गुण ६)**

(१) स्त्रियांच्या आयुष्याशी निगडीत विविध पैलूंवर विचार करणारे संशोधन सुरू झाले.

(२) बखर हा ऐतिहासिक साहित्यातील महत्त्वाचा प्रकार आहे.

(३) तंत्रज्ञानाचा इतिहास अभ्यासावा लागतो.

(४) सर्व प्रसारमाध्यमांत दूरदर्शन अतिशय लोकप्रिय माध्यम आहे.

(५) चित्रपट माध्यमात इतिहास हा विषय महत्त्वाचा आहे.

**प्र.३ (ब) पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही २)** **(गुण ६)**

(१) भारतीय चित्रपटसृष्टीची जननी अशी महाराष्ट्राची ख्याती का आहे?

(२) आकाशवाणीसाठी इतिहास हा विषय कसा महत्त्वाचा आहे, हे स्पष्ट करा.

(३) 'जनांसाठी इतिहास' ही संकल्पना स्पष्ट करा.

**प्र.४ दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(गुण ४)**

ऐतिहासिक वारसास्थळाला भेट देण्यासाठी जाणे याला 'हेरिटेज वॉक' असे म्हणतात. जेथे इतिहास घडला तेथे प्रत्यक्ष जाऊन इतिहास जाणून घेणे ही अनुभूती हेरिटेज वॉकमध्ये येते.

जगभर अशा प्रकारचे उपक्रम चालवले जातात. भारताला शेकडो वर्षांचा इतिहास आहे. भारतातील प्रत्येक राज्यात ऐतिहासिक स्थळे आहेत. यात प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक स्थळे यांचा समावेश होतो. गुजरातमधील अहमदाबाद शहरातील हेरिटेज वॉक प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रात मुंबई-पुणे इत्यादी शहरांमध्ये या उपक्रमांचे आयोजन केले जाते. यामुळे ऐतिहासिक वास्तू जतन करणे, त्याची माहिती जमवणे आणि ती जगभर विविध माध्यमातून पोहचणे इत्यादी उपक्रम चालवले जातात. ऐतिहासिक व्यक्तींची निवासस्थाने ही सुद्धा ऐतिहासिक वारसा असतात. काही ठिकाणी अशा स्थळांवर नीलफलक लावण्याची पद्धत आहे.

(१) 'हेरिटेज वॉक' म्हणजे काय? (१)

(२) हेरिटेज वॉक कोठे आयोजित केला जातो? (१)

(३) हेरिटेज वॉकमध्ये आपल्याला कोणकोणत्या गोष्टींची अनुभूती येते? (२)

**प्र. ५ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही २) (गुण ८)**

(१) ग्रंथालय व्यवस्थापनाचे महत्त्व स्पष्ट करा.

(२) खेळ आणि इतिहास यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.

(३) कलाक्षेत्रात व्यवसायाच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत हे स्पष्ट करा.

(४) उपयोजित इतिहासाचा वर्तमानकाळाशी कसा सहसंबंध असतो?

## राज्यशास्त्र

**प्र.६ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय लिहा. (गुण ४)**

(१) लोकशाहीचा गाभा म्हणजे ................. .

(अ) प्रौढ मताधिकार (ब) सत्तेचे विकेंद्रीकरण

(क) राखीव जागांचे धोरण (ड) न्यायालयीन निर्णय

(२) निवडणूक आयुक्तांची नेमणूक ............... करतात.

अ) राष्ट्रपती ब) प्रधानमंत्री

क) लोकसभा सभापती ड) उपराष्ट्रपती

(३) शेतकरी चळवळीची ............... ही प्रमुख मागणी आहे.

अ) वनजमिनीवर लागवड करण्याचा अधिकार मिळावा

ब) शेतमालाला योग्य भाव मिळावा

क) ग्राहकांचे संरक्षण करणे ड) धरणे बांधावीत

(४) लोकशाहीमध्ये ............... निवडणुकीत सामील होऊन सत्तेत प्रवेश करतात.

अ) राजकीय पक्ष ब) न्यायालये

क) सामाजिक संस्था ड) वरीलपैकी नाही.

**प्र.७ पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. (कोणतेही २) (गुण ४)**

(१) संविधानाचे स्वरूप एखाद्या जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते.

(२) निवडणूक आयोग निवडणुकीदरम्यान आचारसंहिता लागू करते.

(३) लोकशाहीमध्ये चळवळीला फार महत्त्व असते.

**प्र.८ (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा. (कोणत्याही २) (गुण ४)**


(१) माहितीचा अधिकार

(२) राष्ट्रीय पक्ष


(३) मतपेटी ते इव्हीएम (EVM) मशीनचा प्रवास

**(ब) दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा. (कोणतीही २)** **(गुण ४)**

(१)




(२)




(३)

| **राजकीय पक्ष** | **प्रभाव असलेली राज्ये** |
|---|---|
| शिरोमणी अकाली दल | |
| आसाम गण परिषद | |
| द्रविड मुन्नेत्र कळघम | |
| शिवसेना | |

**प्र.९ पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही २)** **(गुण ४)**

(१) राजकीय पक्षांची ठळक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(२) पर्यावरण चळवळीचे कार्य स्पष्ट करा.

(३) भारतात लोकशाहीच्या यशासाठी कोणत्या बाबी आवश्यक आहेत?

(४) निवडणूक आयोगाची कार्ये स्पष्ट करा.